**नियमित दिवाणी दावा क्र.८/२०१९**

**फिरोज विरुध्द प्रतिक्षा**

**CNR:MHSN14-000014-2019**

## नि.क्र. २६ वरील आदेश

वादीने प्रतिवादीच्या विरुध्द निरंतर मनाई करिता दावा दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे वादी नं. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी दिलेला आहे. दाव्याची चौकशी चालू असताना वादी नं. १ फिरोज सिकंदर पिरजादे हे दि. १५/५/२०२१ रोजी मयत झाले आहेत. वादीने नि.क्र. २१ सोबत त्यांचे मृत्यू प्रमाणपत्राची छायांकीत प्रत दाखल केलेली आहे. वादीचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे वादी नं. १ ते ४ असे वारस आहेत. वादीला अर्जात नमूद केल्याप्रमाणे वादी नं. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी दिल्यास न्यायदानास मदत होईल. सदरची दुरुस्ती ही फॉर्मल स्वरुपाची असल्यामुळे त्यामुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. सबब वादीचा अर्ज प्रतिवादी यांना र.रु. २००/- कॉस्ट म्हणून देण्याच्या अटींवर मंजूर करण्यात येतो. वादीने कायदेशीर मुदतीत वादी नं. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेवून दुरुस्त दाव्याची प्रत प्रतिवादींना द्यावी.

HARIDAS SANDIPAN SATPUTE

Digitally signed by HARIDAS SANDIPAN SATPUTE
Date: 2022.02.28 16:23:52 +0530

शिराळा **(एच. एस. सातपुते)**

दिनांक २८/०२/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, शिराळा

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | V. S. Patil |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 28/02/2022 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 28/02/2022 |
| Judgment uploaded on | : | 28/02/2022 |